Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 08 October 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०८ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

जम्मू काश्मीर तसंच हरियाणा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी आज होत आहे. जम्मू काश्मीरमध्ये विधानसभेच्या ९० जागांपैकी नॅशनल कॉन्फरन्स ३९ जागांवर, तर भाजप २८ जागांवर आणि काँग्रेस आठ जागांवर आघाडीवर आहे. हरियाणा विधानसभेच्या ९० जागांपैकी भाजप ४७, काँग्रेस ३६ जागांवर आघाडीवर आहे.

****

७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वितरण होणार आहे. अभिनेते मिथून चक्रवर्ती यांना यावेळी दादासाहेब फाळके पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे. याबरोबरच चित्रपट निर्मिती आणि अभिनयासाठीच्या इतर पुरस्कारांचं वितरणही यावेळी होणार आहे. कन्नड चित्रपट कांतारा मधल्या उत्कृष्ट अभिनयासाठी ऋषभ शेट्टीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार, तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार तामिळ चित्रपट थिरुचित्रंबलमसाठी नित्या मेनन आणि गुजराती चित्रपट कच्छ एक्सप्रेस साठी मानसी पारेख यांना देण्यात येणार आहे.

****

समाजातल्या सर्वांना सरकारकडून आरोग्य सुविधा मिळाव्यात यावर सरकारचा भर असल्याचं, केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी म्हटलं आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या आग्नेय आशिया विभागाच्या समितीच्या ७७ व्या सत्रात ते काल बोलत होते. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री आरोग्य योजनेचा लाभ १२ कोटी कुटुंबांना मिळाला असून, प्रत्येक कुटुंबाला पाच लाख रुपयांपर्यंतचे उपचार दिले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. जागतिक पारंपरिक औषध केंद्राच्या स्थापनेसाठी जागतिक आरोग्य संघटनेला भारतानं पाठिंबा दिला आहे असं नड्डा म्हणाले.

****

सरकार देशातली शेती संस्कृती सुधारण्यासाठी काम करत असल्याचं, केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं. नवी दिल्लीत काल शेतकरी संघटनांच्या बैठकीनंतर ते बोलेत होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारने कृषी विकास योजना, फसल विमा योजनासारखे निर्णय घेतल्याचा पुनरुच्चारही चौहान यांनी यावेळी केला.

****

यावर्षीचा वैद्यकशास्त्रातला नोबेल पुरस्कार व्हिक्टर अँब्रोस आणि गॅरी रुवकुन या संशोधक जोडीला जाहीर झाला आहे. मायक्रो आर एन ए आणि जनुकीय हालचालींच्या नियंत्रणात त्याची भूमिका या शोधाबद्दल त्यांना हा ११ लाख अमेरिकी डॉलर्सचा हा पुरस्कार मिळाला असल्याचं नोबेल पुरस्कार देणाऱ्या कॅरोलिन्स्का इन्स्टीट्यूटनं जाहीर केलं आहे.

****

राज्य सरकारनं सर्व सहकारी संस्था आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक पुढे ढकलली आहे. विधानसभा निवडणुकीमुळे ३१ डिसेंबरपर्यंत या निवडणुका पुढे ढकलत असल्याचा शासन आदेश काल जारी झाला. अडीचशे पेक्षा कमी सदस्य असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था आणि न्यायालयाने आदेश दिलेल्या सहकारी संस्थाच्या निवडणुका नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होतील, असंही सरकारनं या आदेशात स्पष्ट केलं आहे.

****

नाशिकमध्ये लवकरच आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्यात येईल अशी घोषणा, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केली आहे. पालघर जिल्ह्यात जव्हारमध्ये आयोजित पेसा ग्रामसभा महासंमेलनात ते काल बोलत होते. आदिवासी विद्यापीठाअंतर्गत, आंतरराष्ट्रीय दर्जाचं वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्यात येईल, यामध्ये जास्तीत जास्त जागा आदिवासी समुदायातील विद्यार्थ्यांसाठी राखीव असतील असं राज्यपाल म्हणाले.

****

आगामी काळात महाराष्ट्रातल्या सर्व जिल्ह्यांत संविधान भवन उभारण्यात येणार असल्याची घोषणा, केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केली. विरोधक संविधानाबद्दल सामान्य नागरिकांची दिशाभूल करत आहेत. नागरिकांच्या मनातील हा संभ्रम दूर व्हावा, याकरता संविधान भवनाच्या माध्यमातून वास्तव स्थितीची माहिती करून देण्यात येईल असं रिजिजू म्हणाले.

****

महाराष्ट्राच्या बिघडलेल्या राजकीय वातावरणाबाबत साहित्यिकांनी त्यांच्या लेखणीच्या माध्यमातून परखडपणे व्यक्त व्हावं; आपल्यावर टीका होईल अशी भीती साहित्यिकांनी बाळगू नये, असं स्पष्ट मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. नवी दिल्ली इथं होणाऱ्या आगामी मराठी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचं अनावरण महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहत झालं; त्यावेळी ठाकरे बोलत होते. साहित्य संमेलनात राजकारण्यांना बोलावू नका, साहित्य विषयक कार्यक्रम हे साहित्यिकांनी बोलावं आणि राजकारण्यांनी ऐकावं, असेच असले पाहिजेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

****

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत काल गडचिरोली जिल्ह्यातले ८०० ज्येष्ठ नागरिक वडसा रेल्वे स्थानकावरून विशेष वातानुकुलीत रेल्वेगाडीने अयोध्येला मार्गस्थ झाले. आमदार कृष्णा गजबे आणि सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून ही रेल्वे रवाना करण्यात आली.

****

रत्नागिरीतल्या रत्नदुर्ग किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या शिवसृष्टीच्या पहिल्या टप्प्याचं लोकार्पण काल पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झालं. या शिवसृष्टीत उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं लोकार्पणही यावेळी करण्यात आलं. मुंबईतल्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सच्या कलाकारांनी ही शिवसृष्टी साकारली असून, दोन महिन्यांमध्ये तिचं काम पूर्ण होईल, असं सामंत यांनी सांगितलं.

****